नि.दि.दा. क्र. २३२/२०११
लक्ष्मीकांत वि. शामसुंदर
नि.क्र. २०५ पुढे सुरू

**<u>प्रतिवादी क्र. १० तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा उलटतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. एच. पटेल यांचे मार्फत शपथेवर सुरू–</u>**

**२.** माझा सर्वे नंबर ११६ बोरगाव शिवारात आहे. हे म्हणणे खरे आहे की गोपीलाल दायमा यांच्या निधनानंतर वाद मिळकत त्यांच्या वारसांच्या ताब्यात गेली. हे म्हणणे खरे आहे की गोपीलाल दायमा यांचे वारस वाद मिळकतीमध्ये सामाईक राहून उपभोग घेत होते. हे म्हणणे खरे आहे की सन २००१ पर्यंत गोपीलाल दायमा यांच्या वारसांचा वाद मिळकतीमध्ये एकत्रित ताबा होता. हे म्हणणे खरे आहे की वादी हे गोपीलाल दायमा यांचे नातू आहेत. सन २००७ मध्ये वाद मिळकतीच्या झालेल्या खरेदीखतावेळी मी हजर नव्हतो.

**०३.** हे म्हणणे खरे नाही की माझ्या शपथपत्रातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१० यांच्या पतीच्या सांगण्यावरून खोट शपथपत्र दाखल करून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

सा.वा.दा.अ.ब.अ.कबूल केले. माझे समक्ष,

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.06.09 17:16:24 +0530

(एस. एच. नलावडे)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
औसा
दि.०९.०६.२०२६

(एस. एच. नलावडे)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश
क. स्तर, औसा
दि. ०९.०६.२०२६